Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar -431004
Maharashtra (India)
**NAAC Re-accredited A+ Grade**
Telephone : (0240) 2403200
Office PBX : (0240) 2403399/400
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे अ+ दर्जा

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सदर्भः परीक्षा/समन्वय/२०२४-२५/-११८ दिनांक : ०१.०४.२०२५

## Compulsory Six Month Course in Environmental Studies

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

**विषयः** पर्यावरण (अनिवार्य) ची परीक्षा दि. ०५.०४.२०२५ रोजी घेणेबाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विद्यापरिषद व परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निर्णयानुसार Compulsory Six Months Course in Environmental Studies या विषयाची परीक्षा विद्यापीठातर्फे पदवीच्या द्वितीय वर्ष (चौथे सत्र) घेण्याचे ठरलेले आहे. याबाबत आपणास परीक्षा आयोजनासंबंधीत खालीलप्रमाणे सूचना करण्यात येत आहे:-

१) द्वितीय वर्षाच्या "**Environmental Studies**" हा अभ्यासक्रम मार्च/एप्रिल २०१० च्या परीक्षेपासून सर्व पदवी स्तरावरील वर्गासाठी अनिवार्य करण्यात आलेला अूसन काही अभ्यासक्रम/विद्यार्थी यांना वगळण्यात आलेले आहेत. खालीलप्रमाणे आहेत.

क) जे विद्यार्थी बी.एफ.ए.किंवा बी.एड. अभ्यासक्रमास प्रवशित असतील असे.

किंवा

ख) ज्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमामध्ये "**Environmental Studies**" हा एच्छिक विषय घेतलेला असेल

तसेच

ग) बी.एस्सी. बायोटेक पदवी अभ्यासक्रमामध्ये हा विषय घेतलेला असेल असे.

२) या विषयची लेखी परीक्षा ७५ गुणांची असून सदरची लेखी परीक्षा विद्यापीठातर्फे घेण्यात येईल.

३) **Environment Studies** या विषयाची परीक्षा दि. ०५.०४.२०२५ रोजी दुपारी २.०० ते ४.०० वाजेपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयातच **(Home Centre)** प्राचार्यांच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहे.

४) सदर परीक्षेसाठी Multiple Choice Question Paper Cum- Answer Sheet च्या आवश्यक प्रती सर्व संबंधीत महाविद्यालयांना विद्यापीठामार्फत पुरविण्यात येतील.

५) सदरील पेपरच्या प्रश्नपत्रिकेची (Multiple Choice Question Paper) उत्तरे (Answer Key) विद्यापीठाच्या www.bamua.digitaluniversity.ac/compulsory/Compulsory/Environment Studies या वेबसाईटवर दि.१०.४.२०२५ रोजी उपलब्ध करण्यात येईल व ती पुढील आठ दिवसाकरिता वेबसाईटवर उपलब्ध असेल.

६) पर्यावरणशास्त्र परीक्षा उत्तीर्ण होणेसाठी ३५% गुण आवश्यक आहे. (लेखी परीक्षेसाठी २६ गुण आणि फील्ड वर्कसाठी ०९ गुण अनिवार्य आहेत) अंतर्गत व लेखी परीक्षांच्या संपादित गुणाबाबत व इतर माहितीबाबत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे परिपत्रक ACAD/NP/COMP.SCI./ENV.SCI. /2008 / 6587-6786 दि. २०.०६.२००८ चे अवलोकन करावे.

(७) संबंधीत महाविद्यालयामध्ये उत्तरपत्रिका तपासून झाल्यानंतर अंतर्गत आणि सदर लेखी परीक्षेचे गुण व त्यांची एकूण बेरीज गुणांच्या यादीमध्ये दर्शविण्यात यावी.

(८) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येइतक्या प्रमाणपत्राच्या प्रती विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील भांडार कक्षाकडून प्रत्यक्ष प्राप्त करुन घ्याव्यात. महाविद्यालयांनी सदर प्रमाणपत्रपमध्ये संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव, एकूण प्रापत गुण इत्यादी बाबींची नोंद करावी व त्यावर प्राचार्यांचया स्वाक्षरी (स्वाक्षरीचा शिक्का नव्हे) व महाविद्यालयाच्या शिक्कासह अशी प्रमाणपत्रे व मूळ गुणयाद्या परीक्षा विभागातील संबंधीत कक्षामध्ये जमा कराव्यात. त्यानंतर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या सही शिक्कयासह अशी प्रमाणपत्रे व मुळ गुणयाद्या परीक्षा विभागातील संबंधीत कक्षामध्ये जमा कराव्यात. त्यानंतर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या सही शिक्कयासह सदरील प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वाटप करण्यासाठी संबंधीत महाविद्यालयांना परत करण्यात येतील.

(९) महाविद्यालयास पुरविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिक-नि-उत्तरपत्रिका तसेच Field Note Books / Practical Books etc. पुढील आदेशापर्यंत महाविद्यालयामध्ये सुस्थितीत ठेवाव्यात. यथावकाश त्या विद्यापीठातर्फे जमा करण्यात येतील.

(१०) सदर परीक्षेची प्रमाणपत्रे संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना वितरीत करावयाची असून आवश्यक तितकी प्रमाणपत्रे विद्यापीठातर्फे पुरविण्यात येतील. सदर प्रमाणपत्रे ही प्राचार्यच्या सही व महाविद्यालयाच्या शिक्कयासह संबंधित महाविद्यालयाने वितरीत करावयाची आहेत.

(११) विद्यार्थ्यांनी सदरील प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत तृतीय वर्षाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी दाखल करावयाच्या परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करावयाची असून विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्ष परीक्षेचा निकाल त्याखेरीज घोषित करण्यात येणार नाही.

(१२) सदरील परीक्षा ही ज्या त्या महाविद्यालयात (Home Center) होणार असल्यामुळे सर्व संबंधित महाविद्यालयांनी QPDS ची माहिती भरावी त्या शिवाय प्रश्न पत्रिका डाऊनलोड करता येणार नाही व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू शकतात म्हणून कृपया QPDS ची माहिती सर्व संबंधीत महाविद्यालयांनी भरुन घ्यावी.

कृपया सदर परिपत्रक सर्व विद्यार्थी व संबंधीत शिक्षक व प्रशासकिय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे व वरील निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

Bhati

**संचालक**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

याची एक प्रतः उपकुलसचिव, गोपनिय कक्ष यांचे सह सर्व विभागप्रमुख व कक्ष प्रमुख, परीक्षा व मूल्यमापन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.